



"Education through self – help is our motto" – Karmaveer

**Rayat Shikshan Sanstha's**

# Shripatrao Kadam Mahavidyalaya, Shirwal

Dr. Patangrao Kadam Educational Complex
Tal. Khandala, Dist. Satara, Phone : (02169) 245229
Email : skmshirwal@yahoo.in   Website : www.skmshirwal.in

# Research Project

**Year 2021 - 2022**

**Subject :** History

Name of the student : Dere Aparna vitthal

Class : TY BA

Roll No. : 418

Research Topic : Battle of Panipath 1526.





"Education through self – help is our motto" – Karmaveer

**Rayat Shikshan Sanstha's**

# Shripatrao Kadam Mahavidyalaya, Shirwal

**Year 2021 - 2022**

**Subject :** History

**Research Topic :** Battle of Panipat 1526

**Name of the Student :** Aparna Vitthal Dere.

**Name of the Guide :** Dr. pratapsinh Mane.





Rayat Shikshan Sanstha's

# Shripatrao Kadam Mahavidyalaya, Shirwal

## Research Project

Year 2021 - 2022

Date :

# CERTIFICATE

This is certify that Mr. / Miss. Dere Aparna Vitthal

Class T.Y.B.A Roll No. 418 has satisfactorily completed

his / her research Project under my guidance.

Research Project Guide

Principal

## DECLARTION OF RESEARCHER

I / We undersigned declared that the research project entitled ................................................

........Battle of panipath 1526...........................................................................

submitted to Department of ......History.............. Shriptrao Kadam Mahavidyalaya, Shirwal.

is new / innovative and original according to my knowlege.

Signature Of Research Student

# ACKONWLEDGMENT

I would like to express my sincere thanks to our guide Mr / Mrs. / Dr pradeepshinh Mane .................. for allowing me to work on this topic. It gives a great pleasure to express deep sense of gratitude to my guide for his / her valuable guidance, discussion, as well as patience during the work of this research activity / project.

I am also grateful to Principal Dr Manjushree Bobade and head of the department History ........................ for the constant encouragement, inspiration for successful completion of this activity.

I take this opportunity to express my deep Sense of gratitude towards all those who have been directly or indirectly instrumental in the successful completion of this research project.

Signature

Dere Aparna Vitthal

Name of the student

# * INDEX (अनुक्रमाणिका) *


| Sr. No. (अ. क्र) | Particular (तपशिल) | Page No. (पान नं.) |
|---|---|---|
| 1. | Certificate of Research Guide (मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र) | |
| 2. | Declaration of Research (संशोधकाचे प्रमाणपत्र) | |
| 3. | Acknowledgement (ऋण निर्देश) | |
| 4. | Chapter I. Introduction (प्रास्ताविक) | |
| 5. | Chapter II. Research Methodology (संशोधन पध्दती) | |
| 6. | Chapter III. Observations / Experimental / Socio Economic Studies. (निरिक्षण/प्रायोगिक/सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास) | |
| 7. | Chapter IV. Analysis Of Data Collection (संकलित माहितीचे विश्लेषण) | |
| 8. | Chapter V. Results / Findings, Conclusions & Recommendations (निष्कर्ष) | |
| 9. | Bibliography (संदर्भ सूची) | |

# पानिपतचे युद्ध १५२६

पानिपत भारताच्या हरियाणा राज्यातील एक शहर आहे. हे शहर पानिपत जिल्ह्याचे प्रशासकीय केंद्र आहे दिल्ली पासून ९० किलोमीटरवर असून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १ वर आहे. हे शहर भारतीय इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. या शहरात तीन युद्ध लढली गेली या युद्धांमुळे भारतीय इतिहासाला प्रत्येक वेळी वेगळे वळण लागले

या शहराचे संदर्भ महाभारतात आढळतात. धृतराष्ट्राने कुरू साम्राज्याचे विभाजन केले व पांडवांना यमुनेच्या पश्चिमे कडील भाग वाटणीमध्ये दिला. पांडवांनी आपल्या हिंमतीवर पाच शहरांची निर्मिती केली. त्यापैकी एक शहर होते. पांडुप्रस्थ तेच आज पानिपत या नावाने ओळखले जाते.

पानिपतला रणभूमी संबोधले जाते याला कारण आहे या शहराच्या आसपास झालेली तीन युद्ध असे म्हटले जाते कि ही युद्धे झाली नसती तर आजचा भारत नक्कीच वेगळा दिसला असता.

## Chapter II : Research Methodology (संशोधन पध्दती)

### 2.1. Introduction (प्रास्ताविक)

पानिपतचे युद्ध (१५२६)

बाबरच्या स्वारीची बातमी कळताच इब्राहिम लोदीनेही त्याला रोखण्याची तयारी केली. पंजाबतून बाबर दिल्लीकडे निघाला तेव्हा सुलतानाने हमिदखानच्या नेतृत्वाखाली त्यांच्या विरुद्ध सैन्य पाठविले पण बाबरने त्याचा हिस्सारजवळ पराभव केला त्यामुळे त्याच्या उत्साह व आत्मविश्वास वाढला त्याने दिल्लीच्या उत्तरेस पानिपतजवळ सैन्याचा तळ दिला सुलतानही ससैन्य पानिपतवर आला. पानिपतचे युद्ध १५२६ मध्ये दिल्लीचा सुलतान इब्राहिम लोदी आणि बाबर या दोघांमध्ये लढले गेले. बाबरच्या छोट्या परंतु शिस्तबद्ध सेना आणि तोफा यांच्या बळावर लोदीच्या एका लाखापेक्षा मोठ्या फौजेचा त्याने पराभव केला. आणि भारतात मुघल सत्तेचा पाया घातला गेला.

याच बरोबर पानिपतचे युद्ध (१५२६) चा अभ्यास करण्यासाठी आपण पुढील संशोधन पद्धतीचा उपयोग करणार आहोत.

i) ऐतिहासिक संशोधन पद्धती.

ii) विश्लेषणात्मक संशोधन पद्धती.

iii) सर्वेक्षणात्मक पद्धती

iv) सांख्यिकी पद्धती

v) निरिक्षण पद्धती

vi) तुलनात्मक पद्धती

या पद्धतींचा उपयोग करून आपण पानिपतचे युद्ध (७५२६) याचा अभ्यास करणार आहोत.

## 2.2 Statement Of Problem (समस्या विधान)

पानिपतच्या युद्धाची माहिती जाणून घेणे.

## 2.3 Objectives Of Research (संशोधनाची उद्दीष्ट्ये)

1) पानिपतचे युद्ध (१५२६) या युद्धाची पार्श्वभूमी अभ्यासने.

2) पानिपतच्या युद्धातील भारताच्या इतिहासाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

3) पानिपतचे युद्ध १५२६ मुळे मुघली सत्तेचा पाया मजबूत कसा रोवला गेला याचा अभ्यास करणे.

4) पानिपतच्या युद्धाचे इतिहासातील योगदान अभ्यासने

5) पानिपत युद्ध भूमीचा अभ्यास करणे.

6) पानिपतच्या युद्धाचे परिणाम अभ्यासने.

7) भौगोलिक दृष्टीकोनातून पानिपतचा अभ्यास करणे.

# 2.4 Hypothesis of Research Problem (गृहितके)

1) भारताला मध्ययुगीन काळापासून समृद्ध असा इतिहास लाभलेला आहे.

2) पानिपतच्या युद्धामुळे भारताच्या इतिहासाला वेगळे वळण लागले आहे.

3) पानिपतचे युद्ध १५२६ हे समाजाला प्रबोधन कारक व उपयुक्त आहे.

4) पानिपतच्या युद्धामुळे मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला आहे.

5) भारतामध्ये मुघल घराण्याची स्थापना करण्यामध्ये बाबरचे योगदान अभ्यासणे.

6) बाबर हा मुघल घराण्याचा संस्थापक म्हणून ओळखला जातो.

7) पानिपतच्या युद्धामुळे बाबरचे युद्ध कौशल्य अभ्यासता येते.

## 2.5 Data Collection (तथ्य संकलन)

### 2.5.1. Primary Data source (प्राथमिक स्रोत)

1) प्रत्यक्षभेट व स्थानिकांच्या मुलाखती

2) ग्रँड - डफ - मराठ्यांचा इतिहास.

3) भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक

4) मराठी विश्वकोश महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ मुंबई 1977

5) पगडी सेतु माधव (संपा) मोगल दरबारची बातमी पत्रे भाग महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई प्रकाशित.

6) ऐतिहासिक कागदपत्रे व दस्तऐवज

7) शिलालेख

8) बाबरच्या काळातील साधने किंवा साहित्य.

## 2.5.2. Secondary Data Source (द्वितीय स्त्रोत)

1) पानिपतची बखर (रघुनाथ यादव)

2) पानिपत ऐतिहासीक कादंबरी राजहंस प्रकाशन पुणे.

3 पानिपत ऑफिस ऍंड पानिपतच्या मोहिमेचा वस्तुनिष्ठ वृत्तांत. उदय स कुलकर्णी

4) चौबळ ज. स. (अनु) असे होते मोगल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृत मंडळ मुंबई

5) प्रा. ग. ह. खरे. मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई 2009

6) पी. व्ही. काटे. मध्ययुगीन भारत कैलास प. व पब्लिकेशन, औरंगाबाद 1988

## 2.5.3. Scope of Research Problem (संशोधन समस्येची व्याप्ती)

1) हा संशोधनाचा विषय केवळ पानिपतचे युद्धाशी मर्यादीत असला तरी यामध्ये राजकीय, भौगोलिक, सामाजीक, इतिहासाची माहिती द्यावी लागणार आहे

2) मध्ययुगीन काळापासून पानिपतच्या युद्धाशी भारतीय समाजाचा संबंध आलेला आहे.

3) पहली पानिपतचे युद्ध १५२६ हा विषयाची व्याप्ती मुघल साम्राज्याच्या सत्तेचा पाया कशा प्रकारे घालण्यात आला याचा अभ्यास विश्लेषण केले आहे.

४) पानिपतमध्ये मिळालेल्या विजयामुळे बाबरची गणना असामान्य सेनापतींमध्ये होऊ लागली.

५) पानिपतच्या विजयामुळे मुघल घराण्याची सत्ता निर्माण झाली.

## 2.5.4. Limitations of Research (संशोधन मर्यादा)

या संशोधनाची व्याप्ती वरील प्रमाणे असली तरी त्याची मर्यादा ही केवळ पानिपतचे युद्ध १५२६ म्हणजे मुघल साम्राज्याचा पाया घालण्यात आले हे संशोधन केवळ पानिपतच्या युद्धा १५२६ पर्यंत मर्यादीत ठेवण्यात आली आहे.

या संशोधनाचा संबंध हरियाणा भारतातील इतिहासात येत असला तरी संशोधनाचा विषय लक्षात घेऊन आपण फक्त पानिपतचे युद्ध १५२६ चा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

हिंदूस्थानच्या इतिहासात पानिपतची लढाई अत्यंत महत्वाची मानली जाते. ही लढाई निर्णायक ठरली. या युद्धात इब्राहिम लोदीच्या सैन्याची दाणादाण उडाली. इब्राहिम लोदी युद्ध भूमीवर मारला गेला. त्यामुळे दिल्लीवरील अफगाण वंशाची सत्ता नष्ट होऊन दिल्लीवर मुघल साम्राज्याची स्थापना झाली. भारताच्या इतिहासात एक नव्या युगाचा प्रारंभ झाला. हे मुघल साम्राज्य जवळ जवळ दोन शतके टिकून राहिले.

Analysis of Data collection
(संकलित महितीचे विश्लेषण)

पानिपतचे युद्ध (१५२६)

बाबरच्या स्वारीची बातमी कळताच इब्राहिम लोदीनेही त्याला रोखण्यासाठी तयारी केली. त्याने हमिदखानच्या नेतृत्वाखाली त्याच्या विरुद्ध सैन्य पाठविले. बाबरने त्याचा हिस्सारजवळ त्याचा पराभव केला. बाबरने दिल्लीच्या उत्तरेस ह पानिपतजवळ सैन्याचा तळ दिला. सुलतानही सह सैन्य पानिपतवर आला. बाबराने आगोदरच सैन्य रचना डावपेच आखून युद्धाची तयारी केली होती. घोडदळ सज्ज होते. उस्ताद अलीच्या नेतृत्वाखाली बंदूकधारी व मुस्ताफाच्या अधिकाराखाली तोफखाना तयार होता. मध्यभागी स्वत: बाबर सर्व सैन्यावर देखरेख ठेवून होता. त्याच्या मागील बाजूस राखीव फौज ठेवली होती. त्याची ही सैन्यरचना देखरेख ठेवून होता. त्याच्या मदत आशियातील तुलुगामा युद्ध पद्धतीची होती. सैन्यबळ मर्यादित असले तरी शिस्तबद्ध व कार्यक्षम होते. या उलट सुलतानाचे बळ मोठे असले, तरी युद्ध पद्धती जुनी, सैन्य रचना विस्कळीत असून एकनिष्ठतेचा अभाव होता.

अशा परिस्थितीत २१ एप्रिल १५२६ रोजी सकाळी युद्धास सुरुवात झाली. बाबराच्या बंदुका व तोफांच्या माऱ्याने लोदीच्या सैन्यात

मोठी प्राणहानी झाली. बाबराची सैन्य रचना यशस्वी ठरली त्यातच राखीव फौजेने केलेला हल्ला परिणामकारक ठरला आणि केवळ पाच तासांच्या अवधित युद्धाचा निकाल लागला. बाबर विजयी झाला. इब्राहिम लोदी, त्याचा मित्र ग्वाल्हेरचा राजा विक्रमजीत सुमारे १५००० सैन्यासह मारला गेला. या विजयाबद्दल बाबर लिहीतो - "भाल्या एवढा सुर्य वर आला तेव्हा युद्धाची सुरुवात झाली व दुपारपर्यंत चालले. सर्वशक्तिमान परमेश्वराच्या कृपेने शत्रुसैन्याला धुळीला मिळविले."

बाबर दिल्लीचा सत्ताधीश :-

पानिपतच्या विजयामुळे अनेक सरदार येऊन बाबराला मिळाले त्याने आपला मुलगा हुमायून यास दिल्ली, आग्रा इतर प्रमुख शहरे व किल्ले काबीज करण्यास पाठविले त्या प्रमाणे यशस्वी झालेल्या हुमायूनला मोठी लुटही मिळाली. बाबर पानिपतहून दिल्लीत आला आणि २७ एप्रिल १५२६ रोजी त्याने स्वतःला दिल्लीचा सत्ताधीश म्हणून घोषित केले अशा रितीने मुघल साम्राज्याची स्थापना बाबरने केली. त्यानंतर १० मे रोजी तो आग्रा येथे आला व त्याने मोठ्या प्रमाणात दानधर्म केले.

# पानिपतच्या युद्धाचे परिणाम

1) दिल्ली सुल्तानशाहीचा शेवट :-

पानिपतच्या युद्धात सुलतान इब्राहिम लोदीचा पराभव होऊन तो मारला गेला त्याबरोबर त्याची सत्ता संपुष्टात येऊन दिल्लीच्या सुलतानशाहीचा शेवट झाला

2) मुघल सत्तेचा प्रारंभ :-

बाबराने पानिपतचे युद्ध जिंकून दिल्लीची सुलतानशाही नष्ट केली. २१ एप्रिल १५२६ रोजी ही घटना झाली. त्यानंतर बाबर दिल्लीस आला आणि 10 मे रोजी त्याने स्वतःला दिल्लीचा सत्ताधीश म्हणून घोषित केले पुर्वी प्रमाणे स्वारीनंतरही तो मायदेशी परत जाईल हा अनेक जणांचा अंदाज चुकला. त्याने भारतात सत्ता स्थापन केली.

3) राजपुतांच्या अपेक्षाभंग :-

मेवाडचा राणा संग हा त्या काळी उत्तरेतील सर्वात प्रबळ सत्ताधीश होता त्याला दिल्लीवर आपली सत्ता निर्माण करावयाची होती. अर्थात, सुलतानशाही नष्ट करून ते पूर्ण यश मिळविण्यात त्याला यश आले नव्हते. तेव्हा त्यासाठी बाबराचा उपयोग होईल, त्याच्या करवी सुलतानशाही नष्ट होईल, त्यानंतर बाबर परत जाईल आणि आपला हेतू सफल होईल

अशी रजपुतांची अपेक्षा होती त्यासाठी राणा संगने बाबराला सुलतान मारला गेला. पण बाबर दिल्लीत मायदेशी परत न जाता त्याने दिल्लीवर आपली सत्ता प्रस्थापित केली यामुळे रजपुतांच्या अपेक्षा भंग झाल्या.

४) मोठ्या प्रमाणावर प्राणहानी :-

पानिपतचे युद्ध च्यार ते सहा तासांत संपले. पण या ~~अल्प~~ अल्प वेळेत फार मोठ्या प्रमाणात प्राणहानी झाली. रणांगणावर सुलतान त्याच्या मित्र शासका बरोबर सुमारे १५००० पेक्षा अधिक सैन्यासह मारला गेला. पराभवानंतर मुघलांनी पाठलाग करून शत्रु सैन्याची मोठी कत्तल केली. बाबराच्या बाजूचीही जीवहानी झाली. असा प्रकारे या युद्धात सुमारे ४० हजार प्राणहानि झाली असावी.

५) परकीय आक्रमणास पायाबंद :-

प्राचीन काळापासून अनेक परकीयांनी भारतावर आक्रमणे व लुट केली. बाबराने देखील काही स्वाऱ्या केल्या होत्या. पण १५२६ च्या अखेरच्या स्वारीत विजय मिळवून परत न जाता तो या देशातच सत्ताधीश झाला. प्रबळ अशा मुघल ~~सत्ता~~ सत्तेमुळे यापुढे परकीयांच्या आक्रमणांना पायाबंद बसला.

## पानिपतच्या युद्धातील बाबराच्या विजयाची कारणे:

१) नेतृत्वातील फरक !-

पानिपतच्या युद्धात बाबर विरुद्ध इब्राहिम लोदी असे नेतृत्व पणास लागले त्या संघर्षात सरस नेतृत्व विजयी ठरले. बाबर स्वतः शूर योद्धा आणि कुशल सेनापती होता. प्रत्यक्ष युद्धापुर्वी त्याचे योग्य नियोजन व काटेकोर अंमलबजावणी तो करत असे. रणांगणावरील सैन्यरचना जास्तीत जास्त शास्त्रशुद्ध असे मध्य आशियातील 'तुलुगामा युद्ध पद्धती' त्याने राबविली.

२) परिणामकारक शस्त्रास्त्रे !-

युद्धातील जय - पराजय नेतृत्वा बरोबरच वापरल्या गेलेल्या शस्त्रास्त्रांवरती अवलंबून असतो. याचा विचार करता पनिपतच्या युद्धात बाबराने वापरलेल्या बंदुका तोफा उपयुक्त ठरल्या. युद्धास सुरुवात होताच या शस्त्रामुळे शत्रुपक्षाची प्राणहानी सुरू झाला. याच्या युद्धावर परिणाम झाला. बाबराच्या घोडदळाच्या लाभ झाला. आणि राखीव फौजेने ताज्या दमाने हल्ला करून चोख काम केले.

3) सैन्यातील शिस्त व कार्यक्षमता :-

या बाबतीत दोन्ही बाजूला तफावत होती. इब्राहिम लोदीचे सैन्य सुमारे ४०,००० होते. शिवाय बिनलढाऊ लोकांचीही भरणा होता. हे सैन्य सामान्य दर्जाचे होते. जिद्दी व कार्यक्षम नव्हते. प्रामाणिकपणे व शेवटपर्यंत लढण्याची त्यांची तयारी नव्हती.

४) इब्राहिम लोदीचे दुबळे व जुलमी धोरण

इब्राहिम लोदी एका साम्राज्याचा शासक, सुलतान होता. राज्याचे रक्षण, अस्तित्व त्याच्यावर अवलंबून होते. पण एवढी जबाबदारी पेलण्याची त्याची पात्रता नव्हती. त्याच्या स्वभावदोषामुळे त्याचे अनेक सरदार दुखावले होते, असंतुष्ट होते. त्यांनी त्याला मनःपूर्वक पाठिंबा दिला नाही, सहकार्य केले नाही. उलट दौलतखान, आमलखान बाबराच्या संपर्कात राहिले. त्याला स्वारीचे निमंत्रण दिले. रजपुत रजपुत राजांनी सुलतानाला विरोध केला होता.

बाबरने दिल्ली ताब्यात घेतली.

पानिपतवर विजय मिळविल्यावर बाबराने हुमायुनला आग्रा घेण्यासाठी पाठविले. तर सैन्याची दुसरी तुकडी दिल्ली घेण्यासाठी पाठवली. बाबरने आग्रा व दिल्ली जिंकून घेतली. बाबराच्या सैन्याने

प्रचंड लुट केली होती. ती त्याने सर्वांना वाटली. १० मे १५२६ रोजी मोठ्या दिमाखात त्याने दिल्लीमध्ये प्रवेश केला. पानिपतचे युद्ध जिंकल्यावर व प्रचंड संपत्ती मिळविल्यावर बाबर परत काबूलला निघून जाईल अशी सर्वांची अपेक्षा होती बाबरच्या सैन्याची तीच मागणी होती. परंतू बाबर काही परत जाण्याचे नाव काढीना त्यामुळे त्याच्या सैन्यात बंडाळीची परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा बाबराने आपल्या सैन्यासमोर आवेशपुर्ण भाषण करून भारतात कायम राहणे कसे आवश्यक आहे, हे पटवून दिले.

# Chapter - V Results/Findings, Conclusions & Recommendation (सारांश, निष्कर्ष, शिफारशी)

सारांश :-

~~मम~~ भारतातील प्राचीन व मध्ययुगीन ऐतिहासीक कागदपत्रांची सद्यस्थिती नाजूक असून त्यावर उपाय योजना करणे आवश्यक आहे.

पानिपतचे युद्ध (१५२६) हे इब्राहिम लोदी व बाबर यांच्यात झाले. या मध्ये बाबर चा विजय झाला. व मोघल साम्राज्याचा पाया भारतात रोवला गेला.

निष्कर्ष :-

१) पानिपतचे युद्ध हे मध्ययुगीन म कालापासून प्रसिद्ध आहे. यामध्ये पानिपतच्या युद्धाचे ऐतिहासिक दृष्टीने असन्यसाधारण महत्व आहे.

२) पानिपतचे युद्ध (१५२६) हे बाबर यांच्या शिस्तबद्ध पद्धती मुळे त्याने युद्धाबर ~~ला~~ विजय मिळविण्यास यशस्वी झाला.

३) पानिपतचे युद्ध (१५२६) यामध्ये बाबरचे युद्ध कौशल्य दिसून येते. युद्धा बाबतचे त्याचे ज्ञान स्पष्ट होते.

शिफारस :-

पानिपतच्या युद्धाने बाबरने मुघल सत्तेचा पाया भारतामध्ये रोवला गेला